N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** यवतमाळ शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0205 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 13/03/2026 22:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिंनाक पासून):** 13/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 13/03/2026
**Time From (वेळेपासून):** 14:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 13/03/2026 **Time (वेळ):** 22:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 055
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 13/03/2026 22:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** फ्रेंडस बार, स्टेट बक चैक ,यवतमाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अभय मुरलीधर आष्टेकर
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अॅन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळ,यवतमाळ,यवतमाळ शहर,यवतमाळ,महाराष्ट्र, 445001,भारत |
| 2 | स्थायी पता | अॅन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळ,यवतमाळ,यवतमाळ शहर,यवतमाळ,महाराष्ट्र, 445001,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8275088797

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल अरूणराव कुयटे | | | 1. वारको सिटी धामणगाव रोड, यवतमाळ,यवतमाळ,यवतमाळ शहर,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत-445001 |
| 2 | गोपाल महादेवराव मोहाडे | | | 1. सानेगुरूजी नगर, भाग 2लोहारा , यवतमाळ, यवतमाळ,यवतमाळ शहर,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत-445001 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिंयादी पो स्टे ला येताच

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 50,000 | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फियाद दिंनाक 13/03/2026सरतर्फे:- श्री. अभय मुरलीधर आष्टेकर, वय - 50 वर्ष, व्यवसाय - नोकरी, पद - पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ मो.नं. 8275088797 मी समक्ष लेखी फिंयाद देतो की, मी ला.प्र.वि कार्यालय यवतमाळ येथे पोलीस उपअधिक्षक या पदावर कार्यरत आहे. मी दिंनाक 06/03/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालय यवतमाळ येथे हजर असताना तक्रारदार श्री. विक्रम शरद कदम, वय 33 वर्ष, शिक्षण - पदविधर, धंदा – शेती, रा. एस.टि. कॉलनी, लहान वडगांव ता. जि. यवतमाळ मो.क्र. 9011140066 यांनी आमचे समक्ष येवुन तक्रार दिली की, मि वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन मी शेती व्यवसाय करतो. मला मराठी व हिंदी भाषा लिहीता व वाचता येते. मी सन 2025 मध्ये श्री. रामेश्वर महादेव पात्रे रा. मादणी ता. बाभुळगांव जि. यवतमाळ यांचे मौजा मेंढला ता. कळंब शिवारात सर्वे नं. 98/2 मधील 02 हे. 02 आर. शेतजमीन खरेदीचा नोटरी सौदेपत्रादवारे खरेदीचा व्यवहार केला होता. सदर शेत जमीन भोगवटदार वर्ग 2 मध्ये असल्याने शेतजमीन वर्ग 01 केल्यानंतरच खरेदी करण्याचे ठरविले होते. त्यानुसार श्री. रामेश्वर महादेव पात्रे यांनी मा. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे अर्ज केला होता. सदर शेजमीनीचे भोगवटदार वर्ग 2 वरून भोगवटदार वर्ग 1 करणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे पाठपुरवठा करणेबाबत श्री. रामेश्वर पात्रे यांनी मला सांगीतले होते. त्यामुळे मी सदर शेतजमीनीचे भोगवटदार वर्ग 2 वरून भोगवटदार वर्ग 1 करणेकरीता शासकीय नजराणा म्हणुन 2,32,300 रू. चालानदवारे दि. 11/02/2026 रोजी भरलेले आहे. मी माझे कामानिमित्त काही दिंवसापुर्वी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे जावुन तेथील श्री. गोपाल मोहाडे, लिपीक यांची भेट घेतली असता, त्यांनी मला सांगीतले की, तुमच्या प्रकरणामध्ये तहसील कार्यालय, कळंब येथुन तुमची फाईल आमचे कार्यालयात आलेली आहे. तुझे प्रकरण निकाली निघुन सदर शेती भोगवटदार वर्ग 2 वरून वर्ग 1 चा आदेश काढणेकरीता मी तुला मदत करीन व तुझे काम करून देईन तुझे काम करण्यासाठी कोणत्याही वरच्या अधिका-यांना भेटण्याची आवष्यकता नाही. तुझे काम करून देण्याचे मोबदल्यात तु मला 75,000 रू. दे असे सांगीतले तेव्हा मी त्यांना म्हटले की, मी आधीच शासणाचा नजराणा भरलेला आहे. तेव्हा त्यांनी सांगीतले की, तुझे काम करायचे असेल तर मला 75,000 रू. (पंच्याहत्तर हजार रूपये) दयावेच लागतील व सदर रक्कम त्यांचे कार्यालयातील जुने लिपीक श्री. राहुल कुयटे यांचेकडे देण्यास सांगीतले अशा प्रकारे श्री. मोहाडे यांनी मला माझे काम करून देतो त्याचा मोबदला म्हणुन 75,000 रू. लाचेची मागणी केलेली आहे. दिंनाक 28/02/2026 व दि. 05/03/2026 रोजी श्री. राहुल कुयटे यांनी मला फोनदवारे संपर्क करून सांगीतले की, तुझ्या प्रकरणाची फाईल निकाली काढुण देतो. श्री. गोपाल मोहाडे यांनी त्यांचा मोबदला म्हणुन माझ्याकडे तुला 75000 रू. देण्यास सांगीतले आहे ते माझेजवळ दे, मी तुझा आदेश लवकर काढायला लावतो असे म्हणुन मला लाच रक्कम मागीतली आहे. परंतु मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी श्री. गोपाल मोहाडे,लिपीक जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ व श्री. राहुल कुयटे, जुने लिपीक जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ यांचे विरुध्द आज रोजी लाच मागणीची तक्रार देत आहे. माझी श्री.

गोपाल मोहाडे, लिपीक व श्री. राहुल कुयटे यांचे सोबत वैमनस्य नसुन आमचेत देवाण घेवाणीचा व उसणवारीचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. श्री. गोपाल मोहाडे लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ व श्री. राहुल कुयटे यांनी मला लाचेची मागणी केल्याने त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्यात यावी, ही विंनती. मी तक्रारी सोबत श्री. रामेश्वर महादेव पात्रे यांनी मा. जिल्हाधिकारी कार्यालयात केलेल्या अर्जाची छायांकीत प्रत, शेतजमीनीचे सौदेपत्राची छायांकीत प्रत व शासकीय नजराणा भरल्याची छायांकीत प्रत सोबत देत आहे अशी तक्रार दिली. त्यानुसार आम्ही मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, यवतमाळ यांना पत्र देवून गोपनिय कामाकरीता दोन सरकारी कर्मचारी उपलब्ध करून देण्याकरीता पत्र दिले असता, राज्य उत्पादन शुल्क विभाग,यवतमाळ येथील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणून कामकाज करणेस उपलब्ध करून दिले. पंचासमक्ष तक्रारदार यांनी त्यांची वरिलप्रमाणे लेखी तक्रार दिली व त्यात नमुद कागदपत्रे श्री. विक्रम कदम यांनी पंचासमक्ष आम्हाला दिली. यानंतर तक्रारदाराचे विंनती वरून दिनाक 06/03/2026, दिनाक 07/03/2026, दि. 10/03/2026, दि. 12/03/2026 रोजी केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान यातील आलोसे क्र. 02 श्री. गोपाल मोहाडे यांनी लाच रकमेसंबधाने आलोसे क्र. 01 श्री. राहुल कुयटे यांचेशी बोलतो व तक्रारदार यांना त्यांची भेट घेण्यास सांगीतले होते यावरून दि. 13/03/2026 रोजी तक्रारदार यांनी पंचासमक्ष लोकसेवक श्री. राहुल कुयटे यांची समक्ष भेट घेवुन चर्चा केली असता, चर्चे-दरम्यान लोकसेवक श्री. राहुल कुयटे यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबीत काम निकाली काढण्याकरीता मोबदला म्हणुन आलोसे क्र. 02 श्री. गोपाल मोहाडे यांचेकरीता तडजोडी अंती लाच रक्कम 50000 रू. स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले व दि. 13/03/2026 रोजी सापळा कार्यवाहीमध्ये 14.02 ते 15.58 वा. पावेतो दरम्यान लाच रक्कम 50,000 रू. फ्रेंडस बार, स्टेट बॅक चौक यवतमाळ येथे तक्रारदार यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तक्रारदाराचे तक्रारीची पडताळणी कार्यवाही व सापळा कार्यवाहीमधील संभाषण ध्वनिमुद्रीत झाले असुन सदर संभाषणाच्या सवीस्तर ट्रान्सस्क्रिप्ट तयार केली असुन सविस्तर पंचनामे तयार करण्यात आले आहेत.एकंदरीत तक्रारदार नामे विक्रम शरद कदम यांनी दिनाक 06/03/2026 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवरुन लोकसेवक श्री. गोपाल मोहाडे यांचेकडे तक्रारदार यांना पंचासमक्ष पाठवुन लाच मागणीची पडताळणी केली असता लोकसेवक श्री. मोहाडे यांनी तक्रारदारास 75000 रू. चे लाच मागणीचे रकमेसंबंधाने लोकसेवक श्री. राहुल कुयटे यांचे सोबत बोलुन त्यांची तक्रारदाराला भेट घेण्याचे सांगीतले असुन लाचेसंबधाने प्रोत्साहन दिले आहे तसेच यातील लोकसेवक श्री. राहुल कुयटे यांनी दि. 13/03/2026 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदाराचे काम त्यांचेकडे प्रलंबीत नसतांना सुदधा लोकसेवक श्री. गोपाल मोहाडे यांचेकरीता तडजोडी अंती लाच रक्कम 50000 स्कि◌ारण्याचे मान्य करून सापळा कार्यवाहीमध्ये 14.02 ते 15.58 वा. पावेतो दरम्यान लाच रक्कम 50,000 रू. फ्रेंडस बार, स्टेट बॅक चैक यवतमाळ येथे तक्रारदार यांचे कडुन पंचासमक्ष स्विकारली आहे.आरोपी लोकसेवक क्र. 01) राहुल अरूणराव कुयटे वय 38 वर्ष पद वरिष्ठ लिपीक नेमणुक प्रतिनीयुक्ती तहसील कार्यालय, पांढरकवडा रा. वारको सिटी धामणगांव रोड,यवतमाळ आरोपी लोकसेवक क्र. 02) गोपाल महादेवराव मोहाडे वय 44 वर्ष रा. सानेगुरूजी नगर, भाग 2 लोहारा ता. जि. यवतमाळ पद महसुल सहायक नेमणुक महसुल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे हे कृत्य कलम 7, 7(अ), 12 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये अपराध होत असल्याने त्यांचे विरूध्द सदर कलमान्वये गुन्हा नोंद करण्याकरिता मी सरकारतर्फे कायदेशिर फिंयाद देत आहे.( अभय आष्टेकर )पोलीस उपअधिक्षकअँन्टी करप्शन ब्युरो,यवतमाळ अशा फिंयादीचे लेखी रिपोर्ट वरुन कलम 7, 7(अ), 12 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAMKRISHNA PAHADSING JADHAO(I (Inspector)) / API **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAMKRISHNA PAHAD
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** API

HC 1710
स्टे. डा. अंमलदार
पो.स्टे.यवतमाळ शहर